दिनांक २४/०३/२०२१

**<u>प्रसिध्दी पत्रक</u>**

**आरोपी लोकसेवक भरत दत्तु दुतोंडे पद- तलाठी, तलाठी कार्यालय, देवळाई, माऊली नगर, बीड बायपास रोड औरंगाबाद यांनी ३,०००/- रु लाचेची स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद च्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आलोसे यांचे नावे, हुद्दा | :- | भरत दत्तु दुतोंडे पद- तलाठी, तलाठी कार्यालय देवळाई माऊली नगर, बीड बायपास रोड औरंगाबाद रा. म्हसोबा नगर, गजानन मंदीर जवळ, हर्सुल टी पाईंट, औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे चिकलठाणा, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री संदीप राजपुत,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ३,०००/- रु स्विकृती |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या प्लॉटची नोंद सातबारा मध्ये घेण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | तलाठी कार्यालय देवळाई, बीड बायपास रोड औरंगाबाद येथे |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांनी देवळाई परिसरात नवीन प्लॉट खरेदी केलेला आहे. सदर प्लॉटची नोंद सात बारा मध्ये तक्रारदार यांच्या नावांवर घेण्यासाठी तक्रारदार यांचेकडे दुतोंडे, तलाठी हे ४,०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, भरत दुतोंडे पद- तलाठी, तलाठी कार्यालय देवळाई, माऊली नगर, बीड बायपास रोड औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे ४,०००/- रु लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ३,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, भरत दत्तु दुतोंडे पद- तलाठी, तलाठी कार्यालय देवळाई, माऊली नगर, बीड बायपास रोड औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन ३,०००/- रुपये लाचेची रक्कम त्यांचे कार्यालयात स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन चिकलठाणा औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. संदीप राजपुत यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार अरुण उगले, दिगंबर पाठक, केवलसिंग घुसिंगे, चालक अंमलदार चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

24/03/2021

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.